सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग
**पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१)**
गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग,
अंधेरी पोलीस ठाणे आवार, अंधेरी (पुर्व),
मुंबई - ४०० ०६९ यांचे कार्यालय

**सद्रक्षणाय खलनिग्रहणाय**
दूरध्वनी क्र. ०२२-२६८३३०५४
**Email :**
**dcpdetection1.mum@mahapolice.gov.in**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउआ/प्र-१/Press note/ ०५/२०२३ दिनांक : ०२/०२/२०२३

# प्रेस नोट

**महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला ४ के कपंनीचा ६,२४,०००/- किंमतीचा गुटखा विक्री करण्यासाठी टेम्पोमधुन वाहतुक करणाऱ्या दोन आरोपीतांना सापळा लावून अटक केलेबाबत**

| | |
|---|---|
| कक्ष | कक्ष-११, गु.प्र.शा.गु.अ.वि., कांदिवली (प), मुंबई. |
| पोलीस ठाणे | कुरार पोलीस ठाणे |
| गु.र.क्र. व कलम | गु.प्र.शा.गु.अ.वि. गु.र.क्र ०८/२०२३ (कुरार पो.ठा.गुरक्र ८१/२०२३) क ३२८ १८८,२७२, २७३, भादवि सह ५९ अन्न सुरक्षा आणि मानक कायदा २००९ |
| दाखल दिनांक | दिनांक ०२/०२/२०२३ रोजी १३.०८ वाजता |
| गुन्हा घडला दिनांक वेळ व ठिकाण | दिनांक ०२/०२/२०२३ रोजी ०८.३० वाजेच्या सुमारास<br>जय हिंद सेवा संघ चाळ कमिटी, गांधी नगर, कटींग नं. १०, कुरार गाव, मालाड (पु.), मुंबई |
| फिर्यादीचे नाव | पुरुष, वय- ४२ वर्षे |
| आरोपींची संख्या | एकूण दोन आरोपी<br>१) राहुल धनबाहदुर दास उर्फ टेका, वय-२७ वर्षे, रा.ठी. ता. वसई, जि. पालघर,<br>२) सिपाहिलाल भवई पटेल, वय-४० वर्षे रा.ठी. कुरार गाव, मालाड (पुर्व), मुंबई. |

**हकिगत :-** मुंबई शहरामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा विक्री व वाहतुक करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत वरिष्ठांच्या सुचना प्राप्त झाल्या होत्या. त्याअनुषंगाने दि.०२/०२/२०२३ रोजी सपोनि अभिजीत जाधव यांना गोपनीय माहिती मिळाली की, ''गांधी नगर, कटींग नं. १०, कुरार गाव, मालाड (पु.), मुंबई'' येथे महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेल्या गुटख्याने भरलेला टेम्पो येणार आहे'' सदरबाबत मा. वरिष्ठांना माहिती देवून कक्ष-११ चे प्रपोनि विनायक चव्हाण यांचे निर्देशाखाली नमुद ठिकाणी सापळा लावुन संशयीत टेम्पो थांबवून व त्यामधील ईसमांना ताब्यात घेवून टेम्पोची पाहणी केली असता सदर टेम्पोमध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला ४,९९,२००/- रुपये किंमतीचा ४ के कंपनीचा गुटखा मिळून आला. त्याचेकडे अधिक चौकशी केली असता त्याने काही माल त्याचे रहाते घरी ठेवल्याबाबत सांगितले वरुन त्याचे रहाते घराची झडती घेतली असता तेथे महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला १,२४,८००/- रुपये किंमतीचा ४ के कंपनीचा गुटखा मिळून आला. नमूद दोन्ही ठीकाणाहून मिळून आलेला गुटखा तसेच ६,००,०००/- रु किं चा एक महिंद्रा पीकअप टेम्पो असा एकुण १२,२४,०००/-_रु कि चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर छापा कारवाई दरम्यान ताब्यात घेतलेले आरोपीकडे चौकशी केली असता त्याने सदरचा प्रतिबंधीत गुटखा हा जकात नाका दहीसर (पु.), मुंबई येथुन आणला असल्याचे सांगून गांधी नगर, कटींग नं. १०, कुरार गाव, मालाड (पुर्व), मुंबई, येथे आरोपी क्र २ यास देत असल्याची माहीती दिली आहे. सदर टेम्पोमध्ये मिळुन आलेल्या दोन्ही आरोपीविरुध्द कुरार पोलीस ठाणे येथे वर नमुद प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आल असुन वर नमुद प्रमाणे दोन आरोपीतांना अटक करण्यात आली. सदर गुन्हयाचा पुढील तपास हा कक्ष-११ करीत आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, मा. पोलीस उप-आयुक्त (प्र-१) श्री. कृष्णकांत उपाध्याय, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रकटीकरण-उत्तर) श्री. काशिनाथ चव्हाण, प्रभारी पोलीस निरीक्षक विनायक चव्हाण यांच्या मागदर्शनाखाली पो.नि. पाटील, सपोनि अभिजीत जाधव, पोह जयेश केणी, पोह विक्रांत खांडेकर, पोह सचिन खताते, पोहचा उपेंद्र मोरे यांनी पार पाडली आहे. नमुद गुन्हयातील अटक आरोपीतांस दिनांक ०२/०२/२०२३ रोजी मा. अति. महानगर दंडाधिकारी, किल्ला कोर्ट, मुंबई यांचे न्यायालयात रिमांडकामी हजर केले असता मा. न्यायालयाने त्यांना दिनांक ०६/०२/२०२३ पावेतो पोलीस कोठडी सुनावली असून पुढील तपास चालु आहे.

**** D 1/05/2023****